# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/०५/२०२४ (मंगळवार)

---

## मोटरसायकल चोरी करणारा आरोपी नागपूर ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात

फिर्यादी नामे– गणेश अरूणराव डोंगरे, वय ३४ वर्ष, रा. प्रसाद कॉलोनी बुट्टीबोरी हा दि. ०९/०५/२०२४ रोजी १४/३० वा. दरम्यान आपली मोसा क्र. एम एच– ४०/सी व्ही– १३९६ नी बुट्टीबोरी येथील अक्षय नेट कॅफे सामोर मोसा उभी करून ऑनलाईन फॉर्म भरण्या करीता गेले असता फॉर्म भरून कॅफेच्या बाहेर आले कोणत्यातरी अज्ञात चोराने होंडा कंपनी लीओ मोसा एम एच– ४०/सी व्ही – १३९६ किंमती ५०,०००/– रू. ची चोरून नेल्याचे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे बुट्टीबोरी येथे अप क्र. ३८१/२४ कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये अनोळखी आरोपीचा शोध घेणेकामी वरीष्ठांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे गुन्हयाचे तपासकामी विशेष पथक गठीत करून अनोळखी आरोपीचा शोध घेणे सुरू केले. गठीत पथकातील अधिकारी व अंमलदार अनोळखी आरोपीचा शोध घेत असताना फिर्यादीचा मित्र **आरोपी नामे– अंकीत पदमाकर लोंखंडे वय २३ वर्ष रा. टेंभरी बौध्द विहार जवळ ता. जि. नागपुर** यास गुन्हयासंबंधाने विश्वासात घेवुन विचारपुस केली असता उडवाउडविची उत्तरे दिली. अधिक विचारपुस दरम्यान त्याने गुन्हा केल्याची कबुली दिली. यावरून सदर आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली. सदर आरोपीकडुन चोरी केलेली मोसा क्र. होंडा कंपनी लीओ मोसा एम एच– ४०/सी व्ही – १३९६ किंमती ५०,०००/– रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी नागपूर विभाग नागपूर श्रीमती पूजा गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे बुट्टीबोरी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक हृदयनारायण यादव, पोहवा आशिष टेकाम, कुणाल पारधी, युनुस खान, पोशि आशिष कछवा यांनी पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर